**[वेळ : 3.00 तास ]** **[गुण : 100 ]**

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** साहित्य ही संकल्पना स्पष्ट करून ललित साहित्याचे विशेष नमूद करा. २०

**किंवा**

**ब.** समाज आणि संस्कृती या दोन संकल्पना विस्ताराने स्पष्ट करा.

**प्र. २ अ.** महानगरीय साहित्याचे वेगळेपण निर्देशित करणाऱ्या महानगरीय साहित्याच्या विविध वैशिष्ट्यांचा परिचय करून द्या. २०

**किंवा**

**ब.** महानगरीय जीवनाचा अवकाश मांडणाऱ्या ‘क्रमशः’ या कादंबरीचे आशयसूत्र उलगडून दाखवा.

**प्र.३ अ.** मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्य निर्मितीमागील मूलभूत प्रेरणांचा आढावा घ्या. २०

**किंवा**

**ब.** ‘धग असतेच आसपास’ या कल्पना दुधाळ यांच्या कवितांतील विविध आशयसूत्रांचा आढावा घ्या.

**प्र.४** प्रत्येक गटातील एक टीप लिहा. **(एकूण तीन)** ३०

**अ.** १.त्रिमिती सिद्धांत

**किंवा**

२.मानवतावादाचे स्वरूप व विशेष

**ब.** १.महानगरीय कथात्म साहित्य

**किंवा**

२.‘क्रमश:’ कादंबरीतील पात्रचित्रण

**क.** १.ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये

**किंवा**

२.‘धग असतेच आसपास’ मधील बदलते कृषीजीवन



XSAGARDADMINY1CD6C9XSAGARDADMINY1CD6C9

**प्र. ५ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दहा) १०**

1. Race, Milieu आणि Moment या संकल्पनांना मराठीमध्ये काय म्हटले जाते?
2. कार्ल मार्क्स आणि फेडरीक एंगल्स यांच्या विचारव्यूहातून विकसित झालेल्या तत्त्वज्ञानाला काय म्हणून ओळखले जाते?
3. १९ व्या शतकात पॅरिस मध्ये स्त्री प्रश्न मांडण्यासाठी निघालेल्या १८४८ मधील दैनिकाचे नाव काय?
4. हॅरी जॉन्सन यांनी समाजाची किती लक्षणे सांगितली?
5. महानगरीय कथात्म साहित्याचा प्रारंभ कधीपासून मानला जातो?
6. 'क्रमश:' या कादंबरीत पत्र क्र. १८ मधील रामराम गंडभीर यांच्या मुली कोठे काम करत असल्याने त्यांना दु:ख होत असल्याचे नमूद केले आहे?
7. 'क्रमश:' या कादंबरीत पत्र क्र. १६ मध्ये सौ. मनोरमा आत्माराम ढेरे लेखक खालच्या जातीचा असल्याने त्याची काय सुधारली नाही असे सांगते?
8. 'क्रमश:' या कादंबरीमध्ये बाळू कासार पळून गेल्याने आपले उपोषण मागे घेण्याचा निर्णय कोण घेतो?
9. मराठी ग्रामीण कथेत 'साहित्याचा मानबिंदू' म्हणून कोणत्या लेखकाला मानले जाते?
10. "आत्महत्येचं निमंत्रण दिलेल्या विहिरीला लाथाडून परतले आहे मी" या कवितेच्या ओळी कोणत्या कवयित्रीच्या आहेत?
11. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील "बगळ्या बगळ्या कवडी दे, माझ्या आईला लुगडी दे" अशी बगळ्याकडे याचना कोण करतो?
12. कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या कोणत्या कवितेमध्ये 'संपलेल्या आईची गोष्ट' येते?

*************************



XSAGARDADMINY1CD6C9XSAGARDADMINY1CD6C9